# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

(Govt. of Maharashtra Undertaking)


जा.क्र.मप्राशिप/सशिअ/काअ/शि.अ./२०१२-१३/३०८८ दिनांक -1 NOV 2012

## परिपत्रक

**विषय:-राज्यातील सर्व प्राथमिक/ माध्यमिक व अध्यापक विद्यालयामध्ये मित्र उपक्रम राबविण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत.**

---

शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ५ ऑक्टोबर २०११ व २७ जानेवारी २०१२ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतील वर्ग ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनापना साधना वर्ग **"मित्र उपक्रम"** सुरु करण्यात आला आहे.

अनापना विपश्यना साधनेच्या नियमीत दैनंदिन सरावामुळे मुलांची एकाग्रता, स्मरणशक्ती, निर्णय क्षमता वाढते, आत्मविश्वास निर्माण होतो. मुलांची कार्यक्षमता वाढून अभ्यास, शालेय व सहशालेय उपक्रमातील सहभाग वाढतो. विचार आणि आचारामध्ये सकारात्मक बदल घडून येतात व विद्यार्थी स्वयंशासित वर्तन करतो. अनापना विपश्यना साधना स्वाच्छोसवासवर लक्ष केंद्रीत करण्याचे व याद्वारे मनावर नियंत्रण ठेवण्याची नैसर्गिक प्रक्रिया आहे. या अनुभवामळे विद्यार्थ्यांला मनशांती मिळते व इतरांच्या प्रती मैत्री भावनेची प्रेरणा मिळते.

संदर्भीय परिपत्रके आपल्या कार्यालयाला यापूर्वी निर्गमित करण्यात आलेली आहेत. दिनांक २७ जानेवारी २०१२ च्या परिपत्रकातील तरतुदीप्रमाणे या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती राज्य, जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावर करावयाची आहे. ही बाब विचारात घेवून खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. या अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणाचे नियोजन करणे, प्रशिक्षणाला भेटी देणे, शाळेमध्ये दररोज अनापना तासिका होतात किंवा नाही याचा आढावा घेणे, प्रशिक्षणाचा अहवाल वेळोवेळी वरिष्ठांना सादर करणे, प्रशिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणी समजून घेणे व त्यावर उपाययोजना करणे, तज्ज्ञ मार्गदर्शकाची व्यवस्था करणे व




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.

Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

विपश्यना साधना केंद्राशी समन्वय ठेवणे, विपश्यना संपादक मंडळाला माहिती पुरविणे. ही कामे करावीत.

| अ.क्र. | स्तर | पद | कार्यालय |
| --- | --- | --- | --- |
| १ | राज्यस्तर | सहसचांलक (प्रकल्प) | म.प्रा.शि.प.,मुंबई |
| २ | जिल्हास्तर | प्राचार्य (डायट) | प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
| ३ | तालुकास्तर | विस्तार अधिकारी | पंचायत समिती |
| ४ | केंद्रस्तर | केंद्रप्रमुख | केंद्रशाळा |

स्थळ प्रत मा. राज्य प्रकल्प संचालक यांच्या मान्यतेने.

सह संचालक (प्रशासन)
म.प्रा.शि.प.,मुंबई.

प्रत सादर:-

१. डॉ.पी.एस.मीना, अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत सस्नेह अग्रेसित:-

१. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट/विपश्यना ॲकॅडमी, धम्मगिरी, इगतपूरी.

प्रत कार्यवाहीसाठी:-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सर्व
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, सर्व
३. शिक्षणाधिकारी / प्रशासनाधिकारी, मनपा, नपा, सर्व
४. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व.